# नौरोसजी वाडिया कॉलेज, पुणे
# विध्यार्थी विकास मंडळ अहवाल २०२२-२३

शैक्षणिक वर्ष **२०२२-२३** मध्ये विद्यार्थी विकास मंडळतर्फे विविध योजना व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**१) कमवा व शिका योजना :-** कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजने साठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना विविध विभाग व कार्यालयात विविध प्रकारची कामे देण्यात आली. या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या विविध विभागातून ३५ मुले व २८ मुली अशा एकूण ६३ विद्यार्थ्यांनी कमवा व शिका योजनेत सहभाग घेतला होता. ही योजना एप्रिल २०२२ ते फेब्रुवारी २०२३ ह्या कालावधी मध्ये राबविण्यात आली व ह्या योजनेवर एकूण रू. ३,६४,२१७/- मानधनाच्या स्वरुपात विद्यार्थ्यांना देण्यात आले.

**२) स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी अभियान:-** स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत विध्यार्थी विकास मंडळ व रसोयो च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी अभियानात सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी दिनांक २४ जून २०२२ रोजी वारकर्यांनमध्ये जनजागृती करून स्वच्छतेचे व प्लास्टीक मुक्त भारत यांचे महत्व पटवून दिले. सर्वांनी पुणे कॅम्प ते हडपसर रस्त्याची स्वच्छता केली.

**३) स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव :-**

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त नौरोसजी वाडिया महाविद्यालयात दिनांक ९ ऑगस्ट २०२२ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवाचे आयोजन केले होते. प्राचार्य प्रोफेसर डॉ. फरहद सुर्वे , विदयार्थी विकास आधिकारी डॉ. विठ्ठल बोरकर व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सोमनाथ वाघमारे यांनी ९ ऑगस्ट २०२२ रोजी विद्यार्थ्यांसमवेत कॉलेजच्या आवारात बैनर व विविध फलक लावून स्वराज्य महोत्सवाचे उद्घाटन केले. प्राचार्य, विदयार्थी विकास आधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामाची माहिती देवून विद्यार्त्यांमध्ये

देशभक्तीचे स्फुलिंग पेटवले. देश भक्तीपर गीत गात गायन करून व विविध देश्भाकीत्पर घोषणा देवून क्रांती दिन साजरा करण्यात आला. प्राचार्यांनी स्वराज्य महोत्सवातील विविध कार्यक्रर्मांचे व स्पर्धांविषयाची माहिती जाहीर केली.

हर घर तिरंगा अंतर्गत विश्वविक्रमासाठी विद्यापीठाच्या वेबसाईटवर राष्ट्रध्वजाबरोबर फोटो अपलोड करण्याचे अभियान सुरु झाले. या अभियानाची सुरुवात प्राचार्य, विदयार्थी विकास आधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी करून सर्व विदयार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना फोटो काढण्यासाठी प्रेरित केले व त्यांच्या सहकारी व शेजारी यांनाही या अभियानात सहभागी करून जास्तीत जास्त राष्ट्रध्वजाबरोबर फोटो विद्यापीठाच्या वेबसाईटवर अपलोड केले आणि देशभक्ती तेवत ठेवत विश्वविक्रमाला हातभार लावला.

१३ ऑगस्ट २०२२ रोजी स्वराज्य महोत्सवाच्या निमित्ताने दिव्यांग मुलांची रॅली काढण्यात आली होती. या रॅलीचे प्रास्ताविक विदयार्थी विकास आधिकारी डॉ. विठ्ठल बोरकर यांनी केले. प्राचार्य प्रोफेसर डॉ. फरहद सुर्वे यांनी रॅलीत सहभागी दिव्यांग विदयार्थी, NSS व NCC विदयार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना संबोधित केले. यातून दिव्यांग मुलांनी हातात झेंडे घेऊन, देश भक्तीपर गीत गायन करून व विविध देश्भाकीत्पर घोषणा देवून, देशभक्तीसाठी डोळस लोकांचे डोळे उघडले. या रॅलीसाठी लुईस ब्रेल रायटर क्लब समन्वेक प्रा. नीरज भगत, NCC चे ANO लेफ्टनंट कमांडर प्रा. प्रमोद शिंदे, लेफ्टनंट डॉ. विकास जाधव, फ्लाईंग ऑफिसर डॉ. विवेक अंटद, इंग्लिश विभागप्रमुख प्रा.जयंत साळवे यांचे विशेष सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सोमनाथ वाघमारे यांनी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये देश्भक्तीची मशाल पेटवून रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

प्रा. प्रमिला दस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजच्या डीबेटिंग कमिटीने स्वराज्य महोत्सवात देशभक्तीपर प्रश्न मंजुषा स्पर्धाचे आयोजन केले होते. यामध्ये ३८ शिक्षक

व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये ९ विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले व सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले.

१५ ऑगस्ट २०२२ रोजी मॉर्डन एज्युकेशन सोसायटीच्या नौरोसजी वाडिया कॉलेजमध्ये ध्वजारोहण  करून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सुरुवातीला एन. सी. सी. तील विद्यार्थ्यांनी परेड करून तिरंगा झेंड्यास सलामी दिली. प्राचार्य डॉ. फरहद सुर्वे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहन करून हर घर तिरंगाचा नारा देण्यात आला. या प्रसंगी प्रा. संजय भांगरे, प्रा. ऋजुता चतुर प्रा. शोभा सर्वगोड, डॉ. उमा काळे यांनी देशभक्तीवर आधारित कविता सादर केल्या.

यावेळी विद्यार्थ्यांनी प्रा. जयंत साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली  प्रेक्षकांना मुकअभिनयातून भारताच्या तिरंगा झेंड्याची, स्वातंत्र्य सैनिकांची व भारतीय संविधानाविषयीची माहिती दिली. तसेच १५ ऑगस्टविषयी प्रा. जयंत साळवे यांनी लिहिलेल्या गाण्याचे  सादरीकरण निलेश आवारे, जयपाल कसबे, गोपाल बच्छिरे, साक्षी सिंग या विद्यार्थ्यांनी  केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रमिला दस्तुरे यांनी केले.

१७ ऑगस्ट २०२२ रोजी  प्रा. प्रमिला दस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजच्या डीबेटिंग कमिटीने स्वराज्य महोत्सवात देशभक्तीपर वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन केले होते. यामध्ये ४२ विदयार्थी  सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये ८ विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले व सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सोमनाथ वाघमारे व विदयार्थी विकास आधिकारी डॉ. विठ्ठल बोरकर  यांनी  भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त नौरोसजी वाडिया महाविद्यालयात दिनांक  ९ ऑगस्ट २०२२ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवाअंतर्गत '७५०० स्टेप्सची आरोग्य  यात्रा दर दिवसाचे धावणे व चालणे'  हे चॅलेंज देवून विद्यार्थ्यांमध्ये व सहकाऱ्यांमध्ये आरोग्याची

जाणीव जागृत केली. या उपक्रमात मध्ये ८४ विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते. या उपक्रमात सर्व सहभागी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी उपप्राचार्या डॉ. समीना बाक्सवाला-काळे, उपप्राचार्य डॉ. भरत बहुले, कनिष्ठ कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. अशोक मुंढे, रजिस्ट्रार राजेंद्र तागडे, प्रा. सचिन सानप डॉ. सीताराम लटपटे, लेफ्टनंट कमांडर प्रा. प्रमोद शिंदे, लेफ्टनंट डॉ. विकास जाधव, फ्लाईंग ऑफिसर डॉ. विवेक अंटाड, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. सोमनाथ वाघमारे, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी डॉ. विठ्ठल बोरकर डॉ. आत्माराम आंधळे आदी उपस्थित होते.

**४) रक्तदान शिबिर:-** मंगळवार दिनांक 4 ऑक्टोबर 2022 रोजी नौरोसजी वाडिया कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय छात्र सेना आणि माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'रक्तदान शिबिरा'चे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने रुबीहॉल हॉस्पिटल आणि ससून हॉस्पिटल यांचे विशेष योगदान लाभले. या शिबिरामध्ये एकूण ११७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यातून 'रक्तदान हेच खरे श्रेष्ठ दान' असल्याचा संदेश नौरोसजी वाडिया कॉलेजने विद्यार्थ्यांना व जनतेला दिला. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात रक्तदानाचे महत्त्व रुजावे, या हेतूने सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त डॉ. मनोहर सानप, डॉ. अशोक चांडक, प्रा. सचिन सानप, नौरोसजी वाडिया कॉलेजसचे प्राचार्य डॉ. फरहत सुर्वे, उपप्राचार्य डॉ. समीना बॉक्सवाला-काळे, डॉ. भरत बहुले, जुनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. अशोक मुंढे, प्रबंधक राजेंद्र तागडे यांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी झालेल्या रक्तदात्यांना शुभेच्छा दिल्या.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी नौरोसजी वाडिया कॉलेजचे विद्यार्थी छात्र सेना प्रमुख लेफ्टनंट कमांडर प्रा. प्रमोद शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. सोमनाथ वाघमारे, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी डॉ. विठ्ठल बोरकर, फ्लाईंग ऑफिसर डॉ. विवेक आंटद, नौरोसजी वाडिया माजी विद्यार्थी संघटना ऍलुम्नी असोसिएशनचे प्रवीण खांडेलवाल, डॉ. पि. के. पटेल आदींनी प्रयत्न केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यामधील तीन महा. नेवल युनिट एन.सी.सी. व तीन महा. एअर स्कॉडन एन.सी.सी. यातील कॅडेट्सनी आयोजनात सक्रिय सहभाग घेतला.

यावेळी रुबीहॉल हॉस्पिटल पुणे येथील रक्त संक्रमण अधिकारी (ब्लड ट्रांसफ्युजन ऑफिसर) डॉ. शांतीलाल बोरा, वरिष्ठ तंत्रज्ञ संदीप निगडे, रुबीहॉल हॉस्पिटलमधील पी. आर. ओ. श्रीकांत कालेकर, स्टाफ नर्स लक्ष्मी हरिहर, वरिष्ठ तंत्रज्ञ सिद्धार्थ चव्हाण, जनसंपर्क अधिकारी सुनील पाटील, तंत्रज्ञ अमोल मनोहर तसेच ससून हॉस्पिटल येथील रक्तपेढी विभाग कर्मचारी (ब्लड बँक टीम) निवासी डॉ. स्वेता तिवारी, समाज सेवा अधीक्षक किरण ठाकरे उपस्थित होते.

**५) निर्भय कन्या अभियान:-** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या सहकार्याने नौरोसजी वाडिया महाविद्यलयात विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयोगाने दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजी निर्भय कन्या अभियान या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठगीताने झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास आधिकारी डॉ.व्ही. टी. बोरकर यांनी केले. कार्यक्रमाची रूपरेषा ‘अंतर्गत तक्रार निवारण समिती’ समन्वयक प्रा. डॉ.मंजुषा मुसमाडे यांनी सादर केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार यांनी विद्यार्थिनींना निर्भीड होवून आत्मनिर्भर होण्याचा सल्ला दिला.

या कार्यक्रमासाठी श्री. भूषण कातकर व डॉ. प्रज्ञा रोटीथोर या दोन तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व समोपदेशन विद्यार्थिनींना मिळाले. श्री. भूषण कातकर यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व मुलींना पटवून दिले. डॉ. प्रज्ञा रोटीथोर यांनी महिलांच्या आरोग्या विषयक समस्या व त्यावरील उपाय सांगून मुलींचे आरोग्यविषयक शंकाचे निरसन केले.

त्यानंतर 'सक्षम स्त्री कशी असावी आणि एकूण स्त्री सुरक्षेवर पथनाट्य सादर झाले. आता पर्यंत या समाजात् स्त्रीला कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागले आहे, आणि त्यातूनही ती कसा मार्ग काढते आणि सक्षम बनते हे सर्व या पथनाट्यात होते. साक्षी सिंग हिने हा पथनाट्याचे दिग्दर्शन केले होते. पथनाट्यानंतर सर्व सहभागींना नाश्ता देण्यात आला.

दुपारच्या सत्रात श्री. सौरभ खोतकर व त्यांची सहकारी ऐश्वर्या पांगुल यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना, महिला शिक्षक व शिक्षकेतर महिलांना स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षकांनी तायकांदो, कराटे यांचे पायाभूत प्रशिक्षण मुलींना दिले. दहा दहा मुलेंचे गट करून त्यांनी मुलींना स्वयं सुरक्षतेचे प्रात्यक्षिके करून घेतली.

या कार्यशाळेचे आभार प्रदर्शन 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' सदस्य डॉ.ज्योति अनिरुद्ध व राष्ट्रीय सेवा योजना,कार्यक्रम अधिकारी डॉ.सोमनाथ वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. सभागृह सोडण्यापूर्वी सर्व विद्यार्थिनींना सनिटरी नॅप्किनचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार, उपप्राचार्या डॉ. समिना बॉक्सवाला काळे, उपप्राचार्य डॉ. भरत बहुले, उपप्राचार्य प्रा. अशोक मुंढे, ‘अंतर्गत तक्रार निवारण समिती’ समन्वयक प्रा. डॉ.मंजुषा मुसमाडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सोमनाथ वाघमारे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल बोरकर, लुईस ब्रेल रायटर क्लब समन्वक नीरज भगत, मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वसंत बोरकर, लेफ्टनंट कमांडर प्रा. प्रमोद शिंदे , प्रबंधक राजेंद्र तागडे आदी मान्यवर उपस्थितीत होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्थ प्रा. सचिन सानप, डॉ. मनोहर सानप, डॉ. अशोक चांडक यांचे विशेष सहकार्य लाभले. या अभियानात १९३ विद्यार्थिनीं सहभागी झाल्या होत्या.

६) **संविधान दिन:-** शनिवार, दिनांक 26 नोव्हेंबर 2022 रोजी मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या नौरोसजी वाडिया महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमातून, ‘भारत लोकशाहीची जननी’ या संकल्पनेवर आधारित संविधान दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल बोरकर यांनी केले. सकाळी 10.30 वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांसमवेत संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन केले. मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त प्रा. सचिन सानप यांनी संविधानाचे महत्त्व व त्यातील मूलभूत कर्तव्ये सर्व उपस्थितांना समजावून सांगितली.

याप्रसंगी राज्यशास्त्र विभागाचे व्याख्याते प्रा. यशवंत खाडे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी संविधानाचे महत्त्व विशद केले व सद्य परिस्थितीमध्ये समता, एकता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, मानवता व न्याय ही संविधानातील मूलभूत तत्व चिरंतन टिकून राहण्यासाठी सदैव जागरूक राहण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. त्यानंतर

संविधानावर आधारित विद्यार्थ्यांचे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. संविधान विषयक जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्रांगणात संविधान रॅली काढण्यात आली. रॅली नंतर संविधानावर आधारित प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना,कार्यक्रम अधिकारी डॉ.सोमनाथ वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त प्रा. सचिन सानप, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार, उपप्राचार्य प्रा. अशोक मुंढे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सोमनाथ वाघमारे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल बोरकर, लुईस ब्रेल रायटर क्लब समन्वक नीरज भगत, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. अनिल मधाळे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.मंजुषा मुसमाडे, मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वसंत बोरकर, रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डी. जी. वाघमारे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. जयंत साळवे, इतिहास विभाग प्रमुख डॉ.ज्योति अनिरुद्ध, लेफ्टनंट कमांडर प्रा. प्रमोद शिंदे, परीक्षा विभाग अधिकारी डॉ. एस् . जी. लटपटे, सांस्कृतिक अधिकारी हनुमंत लोखंडे, महाविद्यालय प्रबंधक राजेंद्र तागडे, इतर विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त प्रा. सचिन सानप, डॉ. मनोहर सानप, डॉ. अशोक चांडक, प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार, उपप्राचार्या डॉ. समिना बॉक्सवाला काळे, उपप्राचार्य डॉ. भरत बहुले, उपप्राचार्य प्रा. अशोक मुंढे यांचे विशेष सहकार्य लाभले.

**८) दृष्टिहीन विद्यार्थ्यांना लॅपटॉपची वाटप :-** सोमवार, दिनांक ९ जानेवारी २०२३ रोजी मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या नौरोसजी वाडिया कॉलेज मधील २५ दृष्टिहीन विद्यार्थ्यांना हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन व किशनचंद चेलाराम ट्रस्ट यांच्यातर्फे लॅपटॉपची वाटप करण्यात आली. लॅपटॉप बरोबरच त्या मुलांना प्रत्येकी एक स्पेशल कीबोर्ड, पेनड्राईव व लॅपटॉप बॅग दिली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनासाठी प्रकाशमय संजीवनी देणाऱ्या

व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एज्युकेशन, मोबिलिटी, ट्रेनिंग आणि एम्प्लॉयबिलिटी देणाऱ्या कार्यक्रमाचे हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन व किशनचंद चेलाराम ट्रस्ट यांच्यातर्फे आलेल्या सर्व मान्यवरांचे मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, नौरोसजी वाडिया कॉलेज, लुईस ब्रेल राईटर क्लब व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या वतीने सहर्ष स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास आधिकारी डॉ.व्ही. टी. बोरकर यांनी केले. लुईस ब्रेल राईटर क्लबचे समन्वयक प्रा. नीरज भगत यांनी या अनुदानासाठी विशेष परिश्रम घेतले व सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त प्रा. सचिन सानप, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार, उपप्राचार्या डॉ. समिना बॉक्सवाला काळे, उपप्राचार्य डॉ. भरत बहुले, उपप्राचार्य प्रा. अशोक मुंढे, लुईस ब्रेल रायटर क्लब समन्वक नीरज भगत, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सोमनाथ वाघमारे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.  विठ्ठल बोरकर, लेफ्टनंट कमांडर प्रा. प्रमोद शिंदे, प्रबंधक राजेंद्र तागडे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**९) राष्ट्रीय मतदान दिन:-** जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग व मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे नौरोसजी वाडिया कॉलेज पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने  तेराव्या राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त खुल्या निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दि. २५ जानेवारी २०२३ रोजी मतदान दिनानिमित्त मुख्य निवडणुक अधिकारी (महाराष्ट्र राज्य मुंबई ) तसेच जिल्हाधिकारी निवडणूक शाखा पुणे यांनी दिलेल्या सुचनेनुसार, १३ वा राष्ट्रीय मतदान दिवस साजरा करण्यात आला. या स्पर्धांचा उद्देशा मतदान जनजागृती करणे हा होता.

या स्पर्धेचे उद्घाटन मॉडर्न एज्युकेशन  सोसायटीचे नौरोसजी वाडिया कॉलेजचे प्राचार्य वसंत चाबुकस्वार यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी बोलताना, प्राचार्य चाबुकस्वार म्हणाले, लोकशाहीला वाचविण्यासाठी सध्या मतदान करणे ही काळाची

गरज बनले आहे. समाजहित करण्यासाठी मतदानाच्या माध्यमाद्वारे योग्य प्रतिनिधी निवडून देणे हे प्रत्येक भारतिय नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी मतदान जनजागृती मोठ्या प्रमाणात व्हावी,यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांनी आयोजित केलेल्या स्पर्धांचे मी स्वागत करतो. यावेळी उपप्राचार्य प्रा. भरत बहूले, उपप्राचार्य समिना बॉक्सवाला-काळे, उपप्राचार्य अशोक मुंडे, समन्वयक प्रा. प्रमिला दस्तुरे, डॉ. हनुमंत लोखंडे, विद्यार्थी विकास अधिकारी विठ्ठल बोरकर, कॉलेजचे रजिस्ट्रार राजेंद्र तागडे इतर विषयांच, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त प्रा. सचिन सानप हे होते. यांनी आपल्या समारोप समारंभाचे मनोगत व्यक्त करताना,उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक यांना संबोधित केले.वक्तृत्व हे कौशल्य असून जीवनातील यशस्वी प्रवासासाठी शाश्वत अधिष्ठान शोधणे महत्त्वाचे आहे. शिक्षण,साहित्य, कला या तिन्हींचा संगम जीवनाचे यशस्वी अधिष्ठान साधू शकते. यासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. या समारोप समारंभामध्ये महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य वसंत चाबुकस्वार, मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त, यांच्या हस्ते, निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे परीक्षक, यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.स्पर्धक व विजेते विद्यार्थी यांचा सत्कार, सन्मानचिन्ह रोख रक्कम, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. या स्पर्धेमध्ये निबंध लेखनासाठी मराठी भाषेतील 30, इंग्रजी भाषेतील 14, हिंदी भाषेतील चार, निबंध सहभागी झाले होते. निबंध स्पर्धेचे विषय मी नव्या युगाचा मतदार, मतदान हेच श्रेष्ठदान, माझ्या मताची किंमत, बोटाला शाई ते लोकशाही, हे विषय होते. या निबंध लेखनाच्या विषयांचे परीक्षण व मनोगत प्रा. सुरेश धर्माधिकारी, प्डॉ.उमा उत्तम काळे यांनी केले.

वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण प्रा.चारुदत्त निमकर, विद्या खाडे, ऋजुता चतुर, यांनी केले. वक्तृत्व स्पर्धेचे विषय, मी नव्या युगाचा/युगाची मतदार, मतदान हेच श्रेष्ठदान, बोटावरील शाई ते लोकशाही, हे होते. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक चारुदत्त निमकर विद्या खाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर समन्वयक या नात्याने प्राध्यापक हनुमंत लोखंडे, प्राध्यापक प्रमिला दस्तुरे, यांनी निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजनाची भूमिका, याबद्दल प्रास्ताविक केले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून रोहन कवडे या विद्यार्थ्याने आपले मनोगत व्यक्त केले. ही संपूर्ण दिवसभराची स्पर्धा आयोजनासाठी पूर्णवेळ कष्ट ज्यांनी घेतले ते प्रा. यशवंत खाडे, प्रा.अजित मुंडे, प्रा.अक्षय सोनवणे, हे प्राध्यापक पूर्ण वेळ कार्यरत होते. त्यांचे विश्वस्तांनी विशेष कृष्णाचे अर्जुन, या भाषेत कौतुक केले. त्याचवेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. संजय भांगरे, प्रा रेणुका राठोड, यांनी देखील सहाय्यक समन्वयक म्हणून भूमिका निभावली.

वक्तृत्व स्पर्धेसाठी  अत्यंत कमी वेळेमध्ये, पुणे जिल्ह्यातील. 52 विविध महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. अनेकांनी आपला विषय मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. परंतु विद्यार्थ्यांमधील स्पर्धा अत्यंत चुरशीची झाल्यामुळे, स्पर्धेला एक वेगळीच रंगत आली होती.

या जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पूजा राजेंद्र कदम (राज्यशास्त्र विभाग,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) द्वितीय क्रमांक शेख इरफान इकबाल (स्पर्धा परीक्षा केंद्र,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे), तृतीय क्रमांक सार्थक विलास कदम (सी.ओ.इ.पी), उत्तेजनार्थ पुनम दत्तात्रय जाधव, ये जोलीना, नौरोसजी वाडिया कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पटकविले.

तर वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम क्रमांक वृषभ चौधरी, (इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ), द्वितीय क्रमांक  मुग्धा थोरात,(फर्ग्युसन महाविद्यालय पुणे), तृतीय क्रमांक

वैजयंती दरेकर (नौरोसजी वाडिया कॉलेज), उत्तेजनार्थ रोहन कवडे,(कला, वाणिज्य महाविद्यालय वारजे माळवाडी

या संपूर्ण स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. यशवंत खाडे यांनी केले तर, आभार प्रा. कांचन फाटक यांनी मानले.

**१०) 'अभिनय आणि पटकथा लेखन' एक दिवसीय कार्यशाळा:-** गुरुवार दिनांक २ मार्च २०२३ रोजी ही कार्यशाळा सकाळी १० वाजता सुरू झाली. सर्व पाहुणे, मान्यवर, सहभागी सभागृहात दाखल झाले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. पाहुणे, विश्वस्त, प्राचार्य व उपप्राचार्य यांचा सत्कार प्रा.जयंत साळवे यांच्या हस्ते दोन स्वयंसेवकांच्या मदतीने करण्यात आला. स्वागत भाषण डॉ. हनुमंत लोखंडे (सांस्कृतिक अधिकारी) यांनी केले. विश्वस्त प्रा. सचिन सानप व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार विद्यार्थ्यांना संबोधित केले. कार्यशाळेचे आभार प्रदर्शन विद्यार्थी विकास अधिकारी विठ्ठल बोरकर यांनी केले.

या कार्यशाळेचे पहिले सत्र सकाळी 10.30 वाजता सुरू झाले. या सत्रात श्री. किरण यज्ञोपावित (लेखक, दिग्दर्शक, अभिनेते) यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. पद्मिनी माने यांनी श्री. किरण यज्ञोपावित यांचा परिचय करून दिला. श्री.किरण यज्ञोपावित यांनी चित्रपटाची, वेबसेरीजची पटकथा कशी लिहावी या बदल बारकाईने ऊहापोह केला.

दुपारी १२ वाजता दुसरी सुरुवात झाली. हे सत्र प्रा.अविनाश कोल्हे (कादंबरीकार, चित्रपट आणि नाट्य समीक्षक) यांनी घेतले. त्यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनवर टागोरांच्या काबुलीवालाबद्दलची सर्व माहिती सांगितली.

तिसरे सत्र दुपारी २.३० वाजता सुरू झाले. हे सत्र शाहीर संभाजी तांगडे (चित्रपट आणि रंगभूमी) यांनी घेतले. त्यांनी अभिनय कलेचे मार्गदर्शन केले व त्यांचे चित्रपटांतून भूमिका साकारतानाचे अनुभव सांगितले आणि पोवाडा उत्कृष्ठ शैलीत पोवाडा गायन केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक, डॉ.संतोष परचुरे लाभले होते. प्रमुख पाहुणे व मान्यवरांचा सत्कार प्राचार्य यांच्या हस्ते करण्यात आला. मा.विश्वस्तांचे भाषण झाले. डॉ.पद्मिनी माने यांनी प्रमुख पाहुणे डॉ.संतोष परचुरे यांचा परिचय करून दिला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणाऱ्या नौरोसजी वाडिया महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेमेंन्टो देऊन गौरविण्यात आले. या कार्यशाळेत एकूण ९८ विद्यार्थी व विद्यार्थिनीं सहभागी झाले होते.

११) **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा:-**

सोमवार, दिनांक:- ०६/०३/२०२३ रोजी दिव्यांग विद्ध्यार्थ्यांसाठीची कार्यशाळा नौरोसजी वाडिया महाविद्यालयात "विद्यार्थी विकास मंडळ", "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ" व "निवांत अंध मुक्त विकास संस्था" यांच्या सहकार्याने विज्ञान विभागाच्या खोली क्र. 22 मध्ये आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन SPPU आणि NSS गीतांनी झाली. नौरोसजी वाडिया महाविद्यालयाचे विश्वस्थ प्रा. सचिन सानप यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. व्ही. टी. बोरकर यांनी केले. त्यानंतर नौरोसजी वाडिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. चाबुकस्वार यांनी भाषणातून कार्यक्रमाची पार्श्वभूमी व उपयुक्तता स्पष्ट केली. नौरोसजी वाडिया महाविद्यालयाचे विश्वस्थ प्रा. सचिन सानप यांनी भाषणातून कार्यक्रमाचे महत्व स्पष्ट केले व आगामी काळात अश्याच कार्यक्रमांचे आयोजन करणार असल्याची हमी दिली.

पहिल्या सत्राची सुरुवात सकाळी १०:३० वाजता झाली असून त्याचे संचालन निवांत टीमच्या श्रीमती उमा बडवे यांनी केले. त्या स्वलेखनच्या सहसंस्थापक आहेत, ज्या एक सुलभ मराठी टायपिंग ट्यूटर आहेत. त्यांनी ॲपबद्दल अतिशय माहितीपूर्ण आणि संवादात्मक चर्चा केली आणि सोबतच ॲप दृष्टिहीन विद्यार्थ्यांना त्यांचे स्वतःचे पेपर लिहिण्यास आणि लेखकांवर विसंबून न राहण्यास कशी मदत करेल याचे प्रात्यक्षिक दिले. थेट प्रात्यक्षिकात ॲपद्वारे कसे नेव्हिगेट करावे आणि गेमच्या समावेशाद्वारे ॲप किती मजेदार बनले आहे याची अचूक प्रक्रिया समाविष्ट आहे. आभार प्रदर्शनाने ११:३० वाजता पहिल्या सत्राची सांगता झाली.

सकाळी ११:३० वाजता अनिरुद्ध देशपांडे सरांच्या वैदिक गणितावरील तासिकेने दुसऱ्या सत्राची सुरुवात झाली.समस्या त्वरीत सोडवण्याच्या टिप्स आणि युक्त्या यावर त्यांनी एक स्पष्ट धडा दिला.ही चर्चा देखील खूप माहितीपूर्ण होती. अखेरीस NSS स्वयंसेविका प्रार्थना हिच्या आभार प्रदर्शनाने दुसऱ्या सत्राची १२:३० वाजता सांगता झाली .

दुपारी २ वाजता, परदेशात शिकण्याच्या संधी आणि पीएच.डी. करताना आलेले अनुभव - या विषयावर टोनी कुरियन यांनी भाषण केले. ते संशोधनाविषयी बोलले. त्यांनी एक उदाहरण घेऊन शोधनिबंध लिहिण्याच्या आणि संशोधन करण्याचा धडा दिला. त्यानंतर त्यांनी परदेशात शिक्षणाच्या संधी आणि शिष्यवृत्तीच्या मदतीने अंध विद्यार्थी परदेशी शिक्षणाचा कसा उपयोग करू शकतात याबद्दल सांगितले.

त्यानंतर वंदना गांधी मॅडम यांनी बँकिंग परीक्षांबद्दल मार्गदर्शन केले आणि तयारीच्या प्रत्येक टप्प्याबद्दल तपशीलवार माहिती दिली. कार्यशाळेच्या शेवटी सहभागींना प्रमाणपत्रे वाटण्यात आली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सोमनाथ वाघमारे यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. या कार्यशाळेत एकूण ६८ विद्यार्थी व विद्यार्थिनीं सहभागी झाले होते.

कार्यशाळेच्या नियोजनासाठी ल्युस ब्रेल समन्वयक प्रा. नीरज भगत यांचे विशेष सहकार्य लाभले.

डॉ. व्ही. टी. बोरकर
विद्यार्थी विकास अधिकारी

**Photos of the Above Functions**

**स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी अभियान**






**स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव**





# रक्तदान शिबिर








## निर्भय कन्या अभियान






## संविधान दिन


NOWROSJEE WADIA COLLEGE, PUNE
SIR DORABJEE TATA ASSEMBLY HALL




# दृष्टिहीन विद्यार्थ्यांना लॅपटॉपची वाटप







# राष्ट्रीय मतदान दिन






## अभिनय आणि पटकथा लेखन' एक दिवसीय कार्यशाळा






## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा



